


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक १९३ • बुधवार दि.२९ एप्रिल २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## एआय धोरण:लंडनमध्ये आंबेडकर अध्यासन,तीनशे कोटी वृक्ष लागवड



### राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सात महत्वपूर्ण निर्णय

मुंबई/प्रतिनिधी- कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) धोरण २०२६ जाहीर करण्यापासून ते लंडनमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र तसेच राज्यात तीनशे कोटी वृक्ष लागवड सारखे महत्वपूर्ण सात निर्णयांना राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

राज्य मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. या बैठकीत विविध क्षेत्रांसाठी महत्त्वपूर्ण असे सात मोठे निर्णय घेण्यात आले. राज्याच्या भविष्यासाठी महत्त्वाचा मानला जाणारा महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) धोरण २०२६ जाहीर करण्यात आला. या धोरणामुळे राज्यात १० हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक होण्याची शक्यता असून सुमारे दीड लाख रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच राज्यभरात सहा एआय उत्कृष्टता केंद्रे आणि पाच एआय इनोव्हेशन सिटीज उभारण्यात येणार आहेत. सामाजिक न्याय विभागाच्या वतीने मोठा ऐतिहासिक निर्णय घेत लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने कायमस्वरूपी अध्यासन स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. या माध्यमातून डॉक्टरेट अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्तीही दिली जाणार आहे.वन विभागांतर्गत राज्यात हरित महाराष्ट्र आयोग स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली. यासोबतच ३०० कोटी वृक्ष लागवडीची महत्त्वाकांक्षी मोहीम राबविण्यात येणार असून पर्यावरणपूरक विकासाला गती मिळणार आहे.ऊर्जा विभागाने हरित ऊर्जेला चालना देण्यासाठी महाराष्ट्र हरित ऊर्जा व साठवण तंत्रज्ञान एकात्मिक ग्रीड गती योजना (मॅजेस्टिक) राबविण्याचा निर्णय घेतला. या योजनेतून वीज पारेषण क्षमता वाढविणे, हरित ऊर्जा वापराला चालना देणे आणि जागतिक बँकेकडून निधी मिळविणे अपेक्षित आहे. दिव्यांग सक्षमीकरण विभागाने उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पान ४ वर

## मराठवाड्यात उष्णतेचा तडाखा कायम

### नांदेड,धाराशिवमध्ये हलक्या पावसाची शक्यता

नांदेड/प्रतिनिधी- मराठवाड्यात उष्णतेचा तडाखा कायम राहणार असून नांदेड आणि धाराशिव जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता आहे. या विभागात कमाल तापमान ४० ते ४३ अंश सेल्सिअसपर्यंत राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

भारतीय हवामान विभागच्या अंदाजानुसार, पुढील २४ तासांत मराठवाड्यात बहुतांश भागात उष्ण आणि कोरडे हवामान कायम राहणार आहे. दुपारच्या वेळेत उन्हाचा तीव्र चटका जाणवण्याची शक्यता असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.नांदेड आणि धाराशिव जिल्ह्यांत मात्र वातावरणात बदल होऊन काही ठिकाणी हलक्या पावसाच्या सरी कोसळू शकतात. ढगाळ वातावरणासह विजांच्या कडकडाटाची शक्यता नाकारता येत नसल्याने शेतकरी आणि नागरिकांनी सतर्क राहावे, असे हवामान विभागाने म्हटले आहे.दरम्यान, उष्णतेमुळे दैनंदिन जनजीवनावर परिणाम होत असून दुपारच्या वेळेत रस्त्यांवर वर्दळ कमी झाल्याचे चित्र अनेक शहरांत दिसत आहे. बाजारपेठा, बसस्थानके आणि सार्वजनिक ठिकाणी दुपारच्या वेळेत नागरिकांची संख्या घटल्याचे पाहायला मिळत आहे.तज्ज्ञांच्या मते, वाढत्या तापमानामुळे उष्माघात, निर्जलीकरण आणि थकवा यांसारख्या समस्यांचा धोका वाढतो. त्यामुळे पुरेसे पान ४ वर

## सरपंच पोटनिवडणुकीत संतोष देशमुखांच्या पत्नीचा पराभव

बीड:मस्साजोग येथील सरपंच पदाच्या पोटनिवडणुकीत दिवंगत संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. स्वरूपानंद देशमुख यांनी त्यांचा अवघ्या ९२ मतांनी पराभव करत सरपंचपदावर विजय मिळवला आहे. या विजयामुळे स्वरूपानंद देशमुख यांना पुढील १८ महिन्यांचा कार्यकाळ मिळणार आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी हत्या झाल्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी ही पोटनिवडणूक घेण्यात आली होती. या निवडणुकीत अश्विनी देशमुख आणि स्वरूपानंद देशमुख यांच्यात थेट लढत झाली. निवडणुकीदरम्यान अश्विनी देशमुख यांना सहानुभूतीची लाट मिळेल, अशी चर्चा होती. त्यांच्या प्रचारासाठी मुलगी वैभवी आणि मुलगा विराज यांनीही घरभेटी देत मतदारांशी संवाद साधला. अश्विनी देशमुख यांनी दिवंगत संतोष देशमुख यांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी साथ देण्याचे आवाहन केले होते. पान ४ वर




अनुसुचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण त्वरित रद्द करावे या मागणीसाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली आज (बुधवार) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने चर्मकार समाजबांधव सहभागी झाले होते.

## विधानपरिषदेसाठी ठाकरेंकडून अंबादास दानवेंना उमेदवारी

मुंबई/प्रतिनिधी-राज्याच्या राजकारणाचे लक्ष लागलेल्या विधानपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांच्या घोषणांना वेग आला असून भाजपनंतर आता ठाकरेंच्या शिवसेनेकडून महाविकास आघाडीचा अधिकृत उमेदवार जाहीर करण्यात आला आहे. शिवसेना (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे यांनी माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना विधानपरिषदेची उमेदवारी दिल्याची घोषणा केली.



ही माहिती आदित्य ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली असून गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. सुरुवातीला स्वतः उद्धव ठाकरे यांचे नाव चर्चेत होते.काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या पान ४ वर

## मौ.गंगाबेट रेती घाटावर पोलीसांची धाड;२५ लाखांचा ऐवज जप्त



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड तालुक्यातील मौजे गंगाबेट परिसरातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेती उपसा करणाऱ्या ठिकाणी मंगळवारी रात्री नांदेड ग्रामीण पोलीसांनी धाड टाकुन २५ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

मौजे गंगाबेट परिसरातील गोदावरी नदीच्या पात्रातून सर्रासपणे रात्रं-दिवस रेतीचा उपसा सुरु होता. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, इतवारा उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर व पोलीस कर्मचाऱ्यांनी मंगळवारी रात्री रेती उपसा करण्याच्या ठिकाणी धाड टाकली. पोलीसांना बघुन अंधाराचा फायदा घेत पाच जण पळून गेले. पोलीसांनी घटनास्थळावरुन पाण्यात तरंगणारे २० तराफे, ५ इंजीन, ५ ब्रास रेतीचा साठा असा २५ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला. पोलीस शिपाई आसिफ अली यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात पाच जणांविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी घटनास्थळी तराफे व इंजीन पंचासमक्ष नष्ट केले आहे. गंगाबेट, विष्णुपुरी, पिंपळगाव व अन्य काही ठिकाणाहून रेती तस्कर नदीच्या पात्रातून जेसीबी मशिनच्या साह्याने रेतीचा उपसा करीत आहेत.

## जिल्हाधिकारी कार्यालय परिसर ते शहरातील विविध ठिकाणी प्रतिबंधात्मक आदेश

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र दिनानिमित्त १ मे रोजी ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडणार आहे. हा समारंभ सोहळा शांततेत पार पाडण्यासाठी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीकोनातून जिल्हाधिकारी कार्यालय परिसरासह शहरातील विविध ठिकाणी प्रतिबंधात्मक आदेश पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी निर्गमीत केले आहेत.

या आदेशानुसार जिल्हाधिकारी कार्यालय समोर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा ते श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा ते महात्मा गांधी पुतळा ते महाविर चौक, तहसिल कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, शासकीय आयुर्वेध महाविद्यालय तथा शासकीय वैद्यकीय रुग्णालय वजीराबाद नांदेड पर्यंतच्या परिसरातील शांतता व कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी २९ एप्रिल रोजीचे २४.०० वाजेपासून ते २ मे २०२६ च्या ००.०० वाजेपर्यंत उपोषणे, आत्मदहने, धरणे, मोर्चे, रॅली, सत्याग्रह इत्यादी आंदोलनात्मक आयोजनास प्रतिबंध केले आहे. संबंधीतावर नोटीस बजावून त्यांचे म्हणने ऐकूण घेण्यास पुरेसा अवधी नसल्याने आणीबाणीच्या प्रसंगी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) नुसार एकतर्फी आदेश निर्गमीत करण्यात आला आहे, असेही आदेशात नमूद केले आहे.

## नांदेड एज्युकेशन सोसायटी व दयानंद शिक्षण संस्थामध्ये शैक्षणिक सामंजस्य करार




### मराठवाड्याच्या शैक्षणिक वाटचालीला नवे बळ

नांदेड/प्रतिनिधी- हैदराबाद मुक्ती संग्राम लढ्याचे प्रणेते, स्वातंत्र्य सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्थापन केलेल्या, महाराष्ट्रातील नामांकित शिक्षण संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नांदेड एज्युकेशन सोसायटी व लातूर येथील नामांकित दयानंद शिक्षण संस्था यांच्यामध्ये एज्युकेशन इन्स्टिट्यूट पार्टनरशिप अंतर्गत नुकताच शैक्षणिक सामंजस्य करार झाला.

मराठवाड्यातील शैक्षणिक हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लातूरनांदेड मधील दोन शिक्षण संस्था मधील शैक्षणिक करारामुळे नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स महाविद्यालयातील अकरावी, बारावी वर्गात शिक्षण घेणाऱ्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. दोन्ही शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या उद्देशाने शैक्षणिक उपक्रम, अध्यापन पद्धतीची देवाण-घेवाण होणार आहे.नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अकॅडमिक एक्सलन्स प्रोग्राम अंतर्गत सायन्स कॉलेजच्या प्राध्यापकांच्या टीमने सोमवारी लातूरच्या दयानंद शिक्षण संस्थेला भेट दिली. यामध्ये नांएसोचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांच्यासह, सोसायटी सदस्य चिरंजीलाल दागडिया, अविनाश जाधव, प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, उपप्राचार्य एकनाथ खिल्लारे, माजी प्राचार्य डॉ. डीयू गवई, डॉ. एटी शिंदे, प्रा प्रशांत सुतकर, प्रा. एच ए धीरबासी, प्रा. डॉ. विनोद चव्हाण यांचा समावेश होता. दरम्यान दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव विशाल लाहोटी, शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, प्रभारी प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरुडकर, डॉ. संध्या वाडीकर, जेईई समन्वयक रविकुमार, नीट विभाग समन्वयक डॉ.कोमल गोमारे यांनी सर्वांचे सन्मानपूर्वक स्वागत केले व दयानंद शिक्षण संस्थांतर्गत राबविण्यात येत असलेले उपक्रम व दयानंद विज्ञान महाविद्यालयात आयआयटी, एनआयटी, जेईई, नीट, सीईटी परीक्षेसाठी लागणारी तयारी कशा प्रकारे करून घेतली जाते, अनुभवी व तज्ञ प्राध्यापकांनी तयार केलेले स्टडी मटेरियल, विद्यार्थ्यांना शांत वातावरणात अभ्यासाठीची सुविधा, परिक्षेला सामोरे जाताना तणावमुक्तीसाठी आयोजित करत असलेल्या पालक विद्यार्थी शिक्षक सुसंवाद मेळाव्याची व इतर सविस्तर माहिती देण्यात आली.

नांदेड एज्युकेशन सोसायटी व दयानंद शिक्षण संस्था या दोन संस्थेतील करारानुसार दयानंद शिक्षण महाविद्यालयाद्वारे सायन्स महाविद्यालयातील अकरावी, बारावी विद्यार्थ्यांसाठी मोफत ऑनलाइन क्लासेसची सुविधा उपलब्ध करून देत असल्याचे संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी जाहीर केले.याप्रसंगी नांएसो चे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांनी पान ४ वर

# उष्णतेच्या लाटा:विकासाच्या हव्यासात पर्यावरणाचा बळी?



**उष्णतेच्या लाटा एप्रिल ते जून हा काळ भारतासाठी नेहमीच उष्णतेचा असतो; मात्र अलीकडच्या काही वर्षांत उष्णतेच्या लाटांनी भीषण रूप धारण केले आहे. यंदाही देशातील अनेक भागांमध्ये तापमानाने ४५ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला असून, सामान्य जनजीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे. उष्णतेच्या या लाटा केवळ ऋतूतील बदल नाहीत, तर त्या पर्यावरणीय असंतुलनाचे आणि हवामान बदलाचे गंभीर संकेत आहेत. उष्णतेच्या लाटांचा सर्वाधिक फटका गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिकांना बसतो. बांधकाम कामगार, शेतमजूर, रस्त्यावरचे विक्रेते यांना दिवसभर उन्हात काम करावे लागते. तापमानातील वाढ त्यांच्या आरोग्यासाठी घातक ठरते. उष्माघात, निर्जलीकरण आणि हृदयविकार यांसारख्या समस्या वाढताना दिसतात. आरोग्य व्यवस्थेवर यामुळे ताण निर्माण होतो, तसेच मृत्यूंचे प्रमाणही वाढण्याची शक्यता असते. शेती क्षेत्रावरही उष्णतेच्या लाटांचा गंभीर परिणाम होतो. पिकांचे उत्पादन घटते, पाण्याची कमतरता निर्माण होते आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. विशेषतः विदर्भ आणि मराठवाडा सारख्या भागांत आधीच पाण्याची टंचाई असताना उष्णतेची तीव्रता परिस्थिती अधिक बिकट करते. परिणामी, ग्रामीण अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होतो आणि स्थलांतराची समस्या वाढते. उष्णतेच्या लाटांचा मुख्य कारणांपैकी एक म्हणजे हवामान बदल. यामुळे पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत आहे. औद्योगिकीकरण, जंगलतोड आणि कार्बन उत्सर्जन यामुळे वातावरणातील उष्णता वाढते. याच संदर्भात आणखी एक चिंताजनक बाब म्हणजे विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल होत आहे. रस्ते, उद्योग आणि पायाभूत सुविधा उभारण्यासाठी जंगलांचा बळी दिला जात आहे. गडचिरोलीसारख्या घनदाट व डोंगराळ भागात उद्योग उभारणीसाठी डोंगर सपाट केले जात आहेत, ही बाब अत्यंत गंभीर आहे. अशा प्रकारच्या हस्तक्षेपामुळे स्थानिक परिसंस्था उद्ध्वस्त होते आणि तापमानवाढीला चालना मिळते. मग पर्यावरणाचे संतुलन कसे राखले जाईल, याचा गांभीर्याने विचार शासनाने करणे अत्यावश्यक आहे. शहरांमध्ये वाढती काँक्रीटची जंगले, वाहनांची संख्या आणि हरित क्षेत्रांची घट यामुळे ''अर्बन हीट आयलंड'' प्रभाव निर्माण होतो, ज्यामुळे शहरांमध्ये तापमान अधिक वाढते. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यामध्ये संतुलन राखणे ही काळाची गरज आहे. फक्त आर्थिक प्रगतीच्या मागे धावताना नैसर्गिक साधनसंपत्तीचा नाश करणे दीर्घकालीन दृष्टीने घातक ठरू शकते. या समस्येचा सामना करण्यासाठी सरकार आणि समाजाने तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे. शहरांमध्ये अधिक वृक्षारोपण, पाण्याचे योग्य व्यवस्थापन आणि पर्यावरणपूरक विकास धोरणे राबवली पाहिजेत. ''हीट ॲक्शन प्लॅन'' सारख्या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तसेच, नागरिकांनीही स्वतःची जबाबदारी ओळखून पर्यावरण संवर्धनात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. उष्णतेच्या लाटा हा केवळ पर्यावरणीय प्रश्न नाही, तर तो सामाजिक, आर्थिक आणि आरोग्याशी निगडित गंभीर मुद्दा आहे. या संकटाकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात त्याचे परिणाम अधिक भीषण होऊ शकतात. त्यामुळे शाश्वत विकासाची दिशा स्वीकारत पर्यावरणाचे संरक्षण करणे हीच आजची खरी गरज आहे.**

# शिवप्रेमी प्रशांत आंबी याचा जीवनप्रवास शिक्षकाच्या व चळवळीच्या नजरेतून





**गिरीश फोंडे**
कोल्हापूर

प्रशांत हा माझा विद्यार्थी. कोल्हापूर महानगरपालिकेकडे शिक्षक पदावर रुजू झाल्यानंतर सर्वप्रथम मोडकळीस आलेली ऑक्सिजनवर असलेली न्यू पॅलेस स्कूल शाहू महाराजांच्या ऐतिहासिक न्यू पॅलेस जवळची ही केवळ पहिली ते चौथीपर्यंत द्विशिक्षकी शाळा मला डिसेंबर २००२ मध्ये दिली गेली. याचवेळी प्रशांत आंबी हा अत्यंत गरिबीच्या परिस्थितीमध्ये इयत्ता दुसरीमध्ये शिकत होता. त्याच्याबरोबर दुसरा हुशार व आत्मविश्वासू विद्यार्थी धीरज कठारे होता. माझ्याबरोबर दुसरे शिक्षक पाटील सर होते. प्रशांत हा अभ्यासात हुशार व नम्र विद्यार्थी होता. त्याच्या बहुतांशवेळा मरकटलेल्या युनिफॉर्मवरून त्याच्या सामाजिक परिस्थितीची झलक व्हायची. प्रशांतच्या आई वडिलांचे मुळगाव हे कर्नाटकातील. मात्र रोजगारासाठी ते आपले शेती व घर सोडून महावीर कॉलेजजवळ असणाऱ्या झोपडपट्टीमध्ये राहायला आले. त्यांनी पडेल ती मोल मजुरीची कामे केली, भंगार वेचण्याचे काम केले. ही झोपडपट्टी प्रशासनाने महावीर कॉलेज जवळून हटवली. ती राजेंद्रनगर येथे वसवण्यात आली. पाटील सर व मी असे दोघेच शिक्षक असल्यामुळे आलटून पालटून आम्हाला सर्वच वर्गांवर शिकवावे लागे. आम्ही दोन्ही शिक्षकांनी शाळेचा कायापालट करण्याचा निर्णय घेतला. बदलीच्या तयारीत असलेले पाटील सर त्यामुळे याच शाळेत स्थिर झाले. न्यू पॅलेस स्कूलचा परिसर हा शहरात असला तरी येथील लोक ग्रामीण भागातील लोकांप्रमाणे मिळून मिसळून राहत, शाळेच्या बाजूलाच शेतीवर आधारित कुटुंबे देखील होती. शाळेचा कायापालट करत असताना मी ठरवले की आजूबाजूची मंडळी व समाजाचा सहभाग घ्यायचा. हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमच्या निमित्ताने भागातील सर्व महिलांना बोलावले. त्यांच्याकडून शाळा सुधारण्यासाठी सूचनांचा आग्रह धरला. त्यावेळी मात्र आमचे प्रामाणिक प्रयत्न पाहून शेजारील महिला, नागरिक बोलते झाले व त्यांनी या अगोदरील शिक्षकांनी कशा रीतीने शाळेची शिस्त व गुणवत्ता बिघडवली याचा पाढाच वाचला. आम्ही त्यांना आश्वासन दिले की इथून पुढे शाळेमध्ये सर्व गोष्टी या पारदर्शी राहतील व गुणवत्ता आणि शिस्त यासाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही.

शाळेच्या आसपासची स्वच्छता स्वतः प्रशांत सारख्या इतर विद्यार्थ्यांना घेत सुरू केली, शाळेच्या परिसरातील भिंती या अभ्यासक्रमातील घटकांनी रंगवून टाकल्या. रविवारच्या दिवशी देखील कुदळ, खोरे घेऊन प्रशांत व त्याचे विद्यार्थी साथीदार घेऊन शाळेत समोर छोटीशी बाग तयार केली. प्रशांतची आई शाळेच्या शेजारीच मोलमजुरी करायची. त्याचे वडील हे तो ४ वर्षाचा असतानाच वारले होते. काहीवेळा प्रशांतची आई ही मोलमजुरी झाल्यानंतर घरी जळणासाठी लाकडे घेऊनच शाळेकडे यायची. कधी कधी आईच्या मोलमजुरीत मदत करणारी प्रशांतची बहीण देखील आईबरोबर असे. सर्व कुटुंबच खूप कष्टाळू व प्रामाणिक होते. ती प्रशांतला घेऊन जायची. काही वेळा आई, ताईची वाट पाहत तो शाळेच्या परिसरातच शाळा सुटल्यानंतर देखील खेळत राहायचा. मात्र दररोज तो राजेंद्रनगर या १० किलोमीटरवर असलेल्या घरी वंचित लोकांची वस्ती असलेल्या ठिकाणाहून पाटील सरांच्या गाडीवरून यायचा व जायचा देखील. पाटील सरांची चिकाटी व विद्यार्थी प्रेम हे यातून दिसायचे. प्रशांत व धीरज कठारे त्यासोबत आणखी काही विद्यार्थी हे आमचे लाडके विद्यार्थी होते. याचे कारण ते अभ्यासात हुशार, नम्र व आज्ञाधारक होते. काहीवेळा शाळा सुटल्यानंतर देखील प्रशांत पाटील सरांची कामे आवरण्याची वाट पाहत किंवा आई-वडिलांची येण्याची वाट पाहत शाळेच्या प्रांगणात दप्तर उघडून गृहपाठ लिहित बसायचा. मी डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्याबरोबर २००० सालापासून ते पुढे २००५ नंतर गोविंद पानसरे यांच्याबरोबर चळवळीच्या कामास सुरुवात केली होती व अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा सक्रिय पदाधिकारी झालो होतो. महाराष्ट्रातील सर्व चळवळी समजून घेण्याचा प्रयत्न करत होतो. साहजिकच मी वर्गामध्ये सर्व विषय शिकवत असताना सामाजिक भान व वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या मूल्यशिक्षणावर आधारित गोष्टी सांगत असे. ते प्रशांत, धीरज व तृप्ती पाटील, शुभम कांबळे (व इतरही सर्वांची नावे घेत नाही) यांसारख्या विद्यार्थ्यांना आवडायच्या. पाटील सर मात्र विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेकडे तुलनेने जास्त भर द्यायचे, चौथीच्या स्कॉलरशिप परीक्षेमध्ये प्रशांत, धीरज, तृप्ती यासारख्या विद्यार्थ्यांना बसवून त्यांची तयारी करून घ्यायची. त्यामुळे आमच्या दोघांचे अध्यापन हे विद्यार्थ्यांना संतुलित व एकमेकांच्या पूरक होत असे. पुढे आम्ही नवीन नवीन उपक्रम राबवले. पालकांचा सहभाग घेतला. इंग्रजीवर भर दिला.

शाळेमध्ये भौतिक सुविधा, बेंच, माईक, स्टेरिओ यांच्या सुविधा तयार केल्या. त्यासाठी भागातील सामाजिक कार्यकर्ते यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याच वेळी घटनांकडे आम्ही शिक्षण सेवकांची संघटना तयार करून तत्कालीन सभापती यशोदा मोहिते व नगरसेवकांच्या शिक्षक भरतीत भ्रष्टाचारासाठी पैशाची मागणी करण्याच्या विरोधात आंदोलन करू लागलो. परिणामी नोकरीतून बडतर्फ केले. माझ्या शाळेचे पालक एकत्र येऊन मला नोकरीत परत घेण्यासाठी महापौर यांना थेट जाऊन भेटले व सरांना आमच्या शाळेत परत पाठवा अशी मागणी करू लागले. या सर्व चळवळीची वाटचाल आमच्या विद्यार्थ्यांनी जवळून पाहिली. आम्ही २००३ साली पहिल्याच वर्षी इयत्ता पाचवीचा वर्ग सुरू केला. दुसऱ्या वर्षी सहावी व तिसऱ्या वर्षी सातवीचा वर्ग जिद्दीने सुरू केला. सर्वांकष व बहुआयामी शिक्षण व्हावे यासाठी आम्ही सांस्कृतिक कार्यक्रमांवर भर दिला. शाळेचे वार्षिक गॅदरिंग सुरू केले. यामध्ये धीरज व तृप्ती यांच्यासारख्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला पण प्रशांत हा याबाबतीत लाजरा विद्यार्थी, तो स्टेज वरती आलाच नाही. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये देखील आम्ही अंधश्रद्धेविरोधात सामाजिक नाटक रचून ते या विद्यार्थ्यांकडून करून घेतले. थोडक्यात या सगळ्या उपक्रमांच्यामुळेच विद्यार्थी, पालक व शिक्षकांच्यामध्ये अतूट नाते तयार झाले. बंद पडत असलेली शाळा पुन्हा उभारी घेत होती. शाळेत नवीन पाचवी, सहावीचा वर्ग सुरू झाल्याने अनुराधा कदम मॅडम यादेखील चांगल्या शिक्षिका शाळेत बदली होऊन आल्या. शेजारी पालकांच्या घरी भेटी देऊन शाळेची जुनी प्रतिमा मागे सारून गुणवत्तापूर्ण व उपक्रमशील शाळा म्हणून पुढे आणली. त्यानंतर येणारे सर्व शिक्षक हे संयोगाने चांगले व कार्यक्षम लाभले. त्यामध्ये आंबेकर सर, शिंत्रे मॅडम, भापकर सर यासारख्या शिक्षकांचा समावेश होतो. या सर्वांचा प्रशांत, धीरज सारख्या विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये वाटा आहे. आज २०२६ मध्ये देखील ही शाळा टिकून आहे, सातवीपर्यंत चांगला पट आहे व त्या ठिकाणी पाच ते सहा शिक्षक काम करतात. प्रशांत चौथीची स्कॉलरशिप परीक्षा पास झाला, त्याचबरोबर सातवीची देखील. त्यानंतर मात्र त्याने आठवी इयत्तेसाठी हायस्कूल ॲडमिशन घेतले आणि आमचा संपर्क तुटला. आम्ही ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन व युथ फेडरेशनचे दरवर्षी गोविंद पानसरे तसेच कोल्हापुरातील तज्ञ पुरोगामी अभ्यासक यांच्या सहभागाने विद्यार्थ्यांचे पन्हाळ्यावर शिबिर दरवर्षी घेत असून त्याची जबाबदारी २०१० नंतर माझ्यावरती येऊन पडली. माझा शाळेनंतरचा बराचसा वेळ मी शिवाजी युनिव्हर्सिटीमध्ये घालवू लागलो, तिथेच अभ्यास करू लागलो. तेथील विद्यार्थ्यांच्यामध्ये त्यांचे प्रश्न सोडवत सोडवत त्यांना शिबिरामध्ये सहभागी करून घेऊ लागलो.

२०११ साली असेच शिबिर घ्यायचे होते. तेव्हा माझ्या फेसबुक अकाउंटवर फ्रेंडलिस्ट मध्ये नसलेला प्रशांत आंबी याचा प्रोफाइल दिसला. मी त्याला मेसेज केला. सध्या काय करत आहेस? त्यानेही उत्साहाने उत्तर दिले, सध्या कॉलेज मध्ये बारावीचे शिक्षण घेत आहे, परीक्षा दिली आहे निकालाची वाट बघत आहे! मी त्याला सांगितले व्यक्तिमत्व विकास शिबिर पन्हाळ्यावर होणार आहे, त्यात सहभागी होशील काय? त्याने क्षणाचाही विलंब न लावता उत्तर दिले हो नक्की होईन. मी पुढे त्याला विचारले न्यू पॅलेस स्कूलमधील तुझ्या बरोबर वर्गात शिकणारी अजून कोण विद्यार्थी तुझ्या संपर्कात आहेत? त्यांना देखील शिबिरामध्ये आण. त्याने नावे सांगितली पण शिबिरात काही ते लोक आले नाहीत. फक्त प्रशांत आला. त्यावेळी सुशील लाड, प्रशांत पिसे, प्रशांत मगदूम, सनी गावडे हे ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशनचे पुढारी होते. पन्हाळ्यातील शिबिरामध्ये गोविंद पानसरे यांच्याबरोबर इतरही मान्यवरांनी मार्गदर्शन केले. प्रशांतला त्या विचारांचे आकर्षण झाले. तो शिबिरात रमला याचे कारण त्याची कौटुंबिक वंचित घटकांची पार्श्वभूमी व त्याच्यामध्ये असलेल्या प्रस्थापित व्यवस्थे विरोधातील चीड असावी असे जाणवले. त्यानंतर त्याला रायगड मधील कर्जत येथे राज्य शिबिरास इतर पाच विद्यार्थ्यांसमवेत पाठवले. या दहा दिवसाच्या शिबिरामध्ये गोविंद पानसरे, डॉ.भालचंद्र कांगो, राम बाहेती, राम पुनियानी, तानाजी ठोंबरे, नामदेव चव्हाण, राजू देसले, स्मिता पानसरे असे शिक्षक मार्गदर्शन करत. हे शिबिर प्रशांतला खूप भावले. त्याला राज्यभरातून शिबिरासाठी आलेले नवीन मित्र मिळाले आणि प्रशांत आंबी हा चळवळीमध्ये रुजला. त्यानंतर धीरज कठारेला संघटनेत आणले. तोसुद्धा ऑफिसमध्ये येऊ लागला, डाव्या चळवळीतील लोकांच्या ओळखी वाढल्या, प्रशांत आज्ञाधारक असल्याने ऑफिसवरील डाव्या चळवळीचे बहुतांश लोक त्याच्याशी जुळवून घेत. या दरम्यान त्याला गोविंद पानसरे यांचा सहभाग लाभला. प्रशांतने आपले सर्व बालमित्र, झोपडपट्टीतील मित्र यांना ऑफिसवरती आणायला सुरुवात केली. ऑल इंडिया स्टुडंटस फेडरेशनचे काम तो करू लागला. मी त्यावेळी ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशनचा पदाधिकारी राज्य सेक्रेटरी होतो. याच दरम्यान त्याचा आरती रेडेकर या विद्यार्थिनी बरोबर परिचय झाला, ती देखील ऑफिसवर येऊ लागली आणि जवळपास तीन वर्षांपूर्वी जास्त काळातील या मैत्रीचे रूपांतर नंतर प्रेमामध्ये झाले व त्या दोघांनी आंतरजातीय विवाह केला.

मी जरी दररोज बिंदू चौकातील ऑफिसवरती जात नसलो, तरी प्रशांत मात्र दररोज जाऊ लागला. त्यामुळे गोविंद पानसरेंचा सहवास त्याला लाभला. माझ्या प्रशांतकडून संघटन कौशल्याबद्दल अनेक अपेक्षा होत्या. त्यातील काही गोष्टी तो पूर्ण करायचा आजही पूर्ण करतो, पण काही गोष्टी पूर्ण व्हायच्या नाहीत. याबद्दल मला देखील कधीकधी त्याचा राग यायचा. पण त्याचा माझ्या प्रति शिक्षक म्हणून असलेला आदर, अज्ञाधारकपणा व चळवळीतील सातत्य, चिकाटी व समर्पण पाहून मी त्या गोष्टींच्याकडे दुर्लक्ष करत होतो. कॉलेज करत असतानाच आर्थिक परिस्थितीचा ताण असल्याने तो त्याचा बालपणीचा मित्र कृष्णा पानसे याबरोबर सेंटरिंग बांधकाम कामावरती जाऊ लागला. ऑफिसवर बरेच दिवस दिसेना झाल्याने मी चौकशी केली तेव्हा मला हे कळाले. काही महिन्यांनी मात्र तो पुन्हा ऑफिसवर दिसू लागला, तेव्हा विचारणा केल्यानंतर तो म्हणाला की आम्ही ते काम सोडले. हे सगळे करत असताना गोविंद पानसरे हे नेहमी ऑल इंडिया स्टुडंटस फेडरेशनच्या विद्यार्थी कार्यकर्त्यांना व्याख्यानाला जात असताना आपल्या सोबत कारमधून घेऊन जात व शिवाजी कोण होता? आणि इतर चळवळीची पुस्तके ही व्याख्यान हॉलच्या बाहेर किंवा आत कोपऱ्यामध्ये विक्रीसाठी बसायला सांगत. व्याख्यान देणे आणि त्यानंतर पुस्तकाचा संदर्भ देऊन पुस्तक खरेदी करण्याचे आवाहन पानसरे नेहमी करायचे. प्रशांतला यातूनच पुस्तके वाचनाची व पुस्तके विक्रीची गोडी लागली, त्यातूनही काही थोडेफार खर्चासाठी पैसे शिल्लक राहू लागल्यामुळे प्रशांतने पुढे चळवळीसाठी वेळ

*क्रमशः*

# श्री रेणुका देवी संस्थानची मानवतेची झुळूक;ग्रामीण रुग्णालयात शुद्ध पाण्याची दिलासादायक सोय

माहूर/प्रतिनिधी-कडक उन्हाच्या तडाख्यात तहानलेल्या जीवाला पाण्याचा एक घोटही किती अमूल्य वाटतो, याची जाणीव करून देणारा एक हृदयस्पर्शी उपक्रम माहूरमध्ये साकार झाला आहे. उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना आणि त्यांच्या सोबत असलेल्या नातेवाईकांना स्वच्छ, थंड व सुरक्षित पिण्याचे पाणी मिळावे या उदात्त हेतूने श्री रेणुका देवी संस्थानने ग्रामीण रुग्णालयात ५०० लिटर क्षमतेचा अत्याधुनिक वॉटर फिल्टर प्लांट उभारून दिला आहे.

दररोज शेकडो रुग्णांच्या वेदना, चिंता आणि आशेच्या नजरा अनुभवणाऱ्या या रुग्णालयात, उन्हाळ्याच्या दिवसांत पिण्याच्या पाण्याची तीव्र गरज भासत होती. तहान भागवण्यासाठी होणारी धडपड अनेकदा रुग्णांच्या त्रासात भर घालत होती. ही वेदना ओळखून रुग्णालय प्रशासनाने संस्थानकडे मदतीचा हात मागितला आणि त्या हाकेला तत्काळ प्रतिसाद देत संस्थानने संवेदनशीलतेचा आदर्श घालून दिला.संस्थानचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश नरेंद्र के. ब्रह्मे यांच्या मार्गदर्शनाखाली हा वॉटर फिल्टर प्लांट मंजूर करण्यात आला आणि अल्पावधीतच तो कार्यान्वितही झाला. आज या प्लांटमधून मिळणारे स्वच्छ व थंड पाणी म्हणजे रुग्णांसाठी केवळ सुविधा नाही, तर त्यांच्या वेदनेतून मिळणारा एक छोटासा दिलासा ठरत आहे. पाण्याचा एक घोटही जीव वाचवू शकतो, या भावनेतून उभारलेला हा प्रकल्प सामाजिक बांधिलकीचे सुंदर उदाहरण ठरत आहे. या उपक्रमाबद्दल रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांसह रुग्णालय प्रशासनाने श्री रेणुका देवी संस्थानचे मनापासून आभार मानले असून, अशा उपक्रमांमुळे समाजात मानवतेची नवी उब निर्माण होत असल्याची भावना व्यक्त केली आहे.

**'श्री रेणुका देवी संस्थानने हिरीरीने पुढाकार घ्यावा'**

भारतातील अनेक मंदिर संस्था आपल्या उत्पन्नातून व भक्तांकडून मिळणाऱ्या देणग्यांतून मोठ्या प्रमाणावर सामाजिक कार्य करताना दिसतात. पूर, दुष्काळ, महामारी यांसारख्या आपत्कालीन परिस्थितीतही या संस्था समाजासाठी मदतीचा हात पुढे करतात. माहूर येथील श्री रेणुका देवी संस्थाननेही २०२० मध्ये कोरोनाच्या संकटावेळी ११ लाख रुपये आणि २०२५ मध्ये पूरग्रस्तांसाठी १ कोटी रुपयांचा निधी देत आपली सामाजिक बांधिलकी अधोरेखित केली आहे.

मात्र, संस्थानच्या २०१४ च्या घटनेतील तरतुदी आणि भाविकांकडून मिळणाऱ्या मोठ्या उत्पन्नाच्या पार्श्वभूमीवर, माहूर शहर व तालुक्याची सद्य आर्थिक व सामाजिक परिस्थिती पाहता आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, स्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी अधिक व्यापक आणि सातत्यपूर्ण योगदान अपेक्षित आहे.ग्रामीण रुग्णालयातील वॉटर फिल्टर हा एक संवेदनशील आणि कौतुकास्पद उपक्रम असला, तरी अशाच अनेक गरजा आजही पूर्ण होण्याची वाट पाहत आहेत. त्यामुळे संस्थानने अधिक हिरीरीने पुढाकार घेत स्थानिक विकासात सक्रिय सहभाग नोंदवावा, अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा व्यक्त होत आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# जांब बु.जवळ क्रुझर-टिप्परचा भीषण अपघात; २ ठार

मुखेड/प्रतिनिधी-नाजिजधाम (जि.रत्नागिरी) येथून परत येत असताना मुखेड-जांब बु.महामार्गावरील पाखंडेवाडी फाट्याजवळ सोमवारी पहाटे क्रुझर आणि टिपरचा भीषण अपघात झाला. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला तर अन्य १२ जण जखमी झाल्याची घटना मुखेड तालुक्यात दि.२७ रोजी पहाटे घडली आहे. जखमितील प्रवचनकार शंकर पाटील नाकाते (वय-३६) (रा. खतगाव पदे), व नरेश वसंत पोदार (वय-३१) (रा. व्यंकटेशनगर मुखेड) यांना पुढील उपचारासाठी नांदेडला नेत असताना मृत्यू झाल्याने त्यांच्यावर काल सायंकाळी उशिरा शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

मुखेड व देगलूर तालुक्यातील नरेंद्र महाराजांचे भक्त नानीज येथून दर्शन करून परत येत होते. जाब बुद्रुक जवळील पाखंडेवाडी फाट्याजवळ मुख्य रस्त्यावर थांबलेल्या रेतीचे हायवाला (एमएच-२६-सीएच-२५१६), क्रुझरने (एमएच-२६-बीसी-०१६६) पाठीमागून जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाल्याचे सांगितले जाते.यातील जखमी शिवकांता नागनाथ श्रीरामे रा. शिकारा, तेजस्विनी महेश पोतदार, परी नरेश पोतदार, सुंदरी नागनाथ श्रीरामे सर्व रा. मुखेड तसेच लिंगोजी शामराव करेवाड रा. पेठवडज, विमलबाई रामू पांचाळ, दिलीप व्यकट शिल्पकार, वैभव मारोती पांचाळ, सरस्वती पांचाळ सर्व (सर्व रा. देगलूर) यांच्यावर शासकीय दवाखान्यात उपचार चालू आहेत. या जखमींना मुखेड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करताच वैद्यकीय अधिकाऱ्यानी त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू केले. वैद्यकीय अधिकारी डा.तैबानी उमेर, डा.वर्षा कोरडे, अधिपरिचारिका पूजा वाघमारे, वर्षा पांचाळ, विजय कोनापूरे, रुग्णालयातील इतर कर्मचाऱ्यांनी जखमेवर त्वरित उपचार केले कक्ष सेवक माऊली धनगे शैलेश पाटील, संदीप पवार, अक्षय बेथळगे यांनी मदत कार्य केले तसेच १०८ रुग्णवाहिका सेवेमधील डा. कागणे, चालक लक्ष्मण पा. वडजे व मारुती आचमारे यांनी अपघात स्थळावरून जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिक्षक डा.आदमपूरकर यांनी तातडीने १०२ रुग्णवाहिका उपलब्ध करून देऊन गंभीर जखमिना नांदेडला पाठविण्याची व्यवस्था केली. मयत शंकर पाटील नकाते हे जगद्गुरु नरेंद्रचार्य महाराज यांचे जनम प्रवचनकार होते. त्यांच्या अकाली निधनाने मुखेड तालुक्यातील भक्तगण शोक सागरात बुडाला. त्यांच्या पश्चात आई, तीन भाऊ, दोन बहिणी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

# पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते १ मे रोजी ध्वजवंदन

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिवस समारंभ शुक्रवार १ मे २०२६ रोजी वजिराबाद पोलीस मुख्यालय कवायत मैदान, नांदेड येथे सकाळी ८ वा. राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभ होणार आहे. राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते ध्वजवंदन होणार आहे. या समारंभास उपस्थित रहावे, असे आवाहन नांदेड जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

या मुख्य शासकीय कार्यक्रमास सर्वांना उपस्थित राहता यावे यासाठी इतर सर्व कार्यालय, संस्था, आदींनी त्यांचे ध्वजवंदनाचे समारंभ सकाळी ७.१५ पुर्वी किंवा ९ वाजेनंतर आयोजित करावेत. सर्व निमंत्रितांनी राष्ट्रीय पोशाखात समारंभ सुरू होण्यापूर्वी २० मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया बॅग सोबत आणू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या दिनानिमित्त विविध कार्यक्रम, समारंभ आदी ठिकाणी राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पध्दतीबाबत शासन परिपत्रक तसेच ध्वजसंहितेतील सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. गृहविभागाच्या राष्ट्रध्वजाच्या उचित सन्मानाबाबतच्या परिपत्रकात नमूद केलेल्या निर्देशनानुसार राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकचा वापर होणार नाही, याची दक्षता संबंधितानी घ्यावी, असेही आवाहनही केले आहे.

# अक्षय तृतीयापासून जिल्ह्यात ११ बालविवाह रोखले

## महिला व बाल विकास विभागाची धडक कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-महिला व बाल विकास विभागाच्या सतर्कतेमुळे अक्षय तृतीयाच्या मुहूर्तापासून नांदेड जिल्ह्यात विविध ठिकाणी होऊ घातलेले एकूण ११ बालविवाह रोखण्यात यश आले आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

चाईल्ड लाईन १०९८ ही राष्ट्रीय आपत्कालीन सेवा २४ तास कार्यरत असून, बालकांच्या काळजी व संरक्षणाशी संबंधित तक्रारींचे निराकरण करण्यात येते. १९ एप्रिलपासून अक्षय तृतीयाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात विविध ठिकाणी बालविवाह होत असल्याच्या तक्रारी १०९८ या टोल फ्री क्रमांकावर प्राप्त झाल्या. या तक्रारींची तात्काळ दखल घेत महिला व बाल विकास विभाग, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, पोलीस प्रशासन तसेच स्थानिक प्रशासन यांच्या समन्वयातून थेट घटनास्थळी जाऊन कारवाई करण्यात आली. सदर कारवाईदरम्यान संबंधित वधू-वरांचे वय तपासून बालविवाह थांबविण्यात आले. त्यामुळे संभाव्य अनर्थ टळले. देगलूर तालुक्यातील १, नायगाव तालुक्यातील २, लोहा तालुक्यातील ३, नांदेड तालुक्यातील ३, भोकर तालुक्यातील १ व मुखेड तालुक्यातील १ असे एकूण ११ बालविवाह रोखण्यात यश आले आहे.बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ नुसार विवाहासाठी मुलाचे किमान वय २१ वर्षे व मुलीचे १८ वर्षे असणे आवश्यक आहे. या संदर्भात विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत आहे. ग्रामस्तरावर ग्रामपंचायत अधिकारी व अंगणवाडी सेविका यांची भूमिका बालविवाह प्रतिबंधासाठी महत्त्वाची ठरत आहे.जिल्ह्यात कुठेही बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ १०९८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

# नीट परीक्षार्थींची होणार वैद्यकीय तपासणी

नांदेड/प्रतिनिधी-नीट प्रवेश परीक्षा काळात प्रतिबंधित वस्तूच्या वापरांवर प्रशासनाचे कडक लक्ष असून, इलेक्ट्रॉनिक, ब्लूटूथ वापर बंदी करण्यासाठी परीक्षार्थींची वैद्यकीय तपासणी होणार आहे. जर परीक्षा केंद्रावर प्रतिबंधीत करण्यात आलेल्या वस्तू परीक्षार्थीकडे आढळून आल्यास तो अनुचित साधनांचा वापर मानला जाईल. नियमानुसार व कायद्यानुसार संबंधित उमेदवारा-विरुध्द कारवाई करण्यात येईल. याची नोंद सर्व परीक्षार्थींनी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

राष्ट्रीय परीक्षा एजन्सी नवी दिल्ली मार्फत आयोजित नीट प्रवेश परीक्षा नांदेड जिल्ह्यात ३ मे २०२६ रोजी दुपारी २ ते ५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. सदरील परीक्षेकरिता नांदेड जिल्ह्यात एकूण ४६ केंद्र असून त्यापैकी नांदेड शहरात २४ परीक्षा केंद्रे तसेच ग्रामीण भागात २२ परीक्षा केंद्र अशी एकूण ४६ परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आलेली आहेत. नीट प्रवेश परीक्षेसाठी पात्र उमेदवारांनी ३ मे २०२६ रोजी परीक्षा केंद्रावर सकाळी ठीक ११ वाजता रिपोर्टींग करावे. स.११ ते १.३० ही वेळ परिक्षार्थींची तपासणीची वेळ राहील. परीक्षा केंद्रावर परीक्षा कालावधीत परीक्षार्थी मार्फत कोणत्याही गैर मार्गाचा अवलंब होऊ नये. जसे की, इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा, ब्लूटूथचा वापर तसेच मनगटी डिजिटल घडयाळीचा वापर करण्याचे परीक्षार्थी यांनी कटाक्षाने टाळावे तसेच वरील बाबींना आळा घालण्यासाठी परीक्षार्थी यांची परीक्षा केंद्रावर वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत कान, नाक, घसा संबंधाने तज्ञांकडून तपासणी केली जाणार आहे याची सर्व परीक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी. उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत नीट प्रवेश परीक्षा केंद्रामध्ये खालील वस्तू घेऊन जाण्याची परवानगी असणार नाही. उदा. मजकूर साहित्य, मुद्रित किंवा लिखित कागदाचे तुकडे, भूमिती पेन्सिल, बॉक्स, प्लास्टिक पाऊच, कॅल्क्युलेटर, स्केल, लेखन पॅड, पेन ड्राईव्ह, कॅल्क्युलेटर लॉंग टेबल, इलेक्ट्रॉनिक पेन स्कॅनर इत्यादी कोणतीही स्टेशनरी वस्तू उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर आणू नये. नीट प्रवेश परीक्षा केंद्रावर ड्रेस कोड संदर्भाने आयोगाने दिलेल्या निर्देशाचे तंतोतंत पालन परीक्षार्थी यांनी करावे. जसे की, वजनाने भारी असलेला पोशाख फुलबाहीचा शर्ट प्रतिबंधित असून सांस्कृतिक व पारंपारिक पोशाखास तपासणी संदर्भाने परीक्षेच्या दिवशी सकाळी ११.३० वा. च्या अगोदर परीक्षा केंद्रावरील यंत्रणेकडून तपासणी करून घ्यावी.

# रमाई वधू-वर केंद्राचे उद्घाटन संपन्न

नांदेड/प्रतिनिधी-बुद्धभूमी पिवळी गिरणी, नांदेड येथे रमाई वधू-वर सूचक केंद्र कार्यालयाचे उद्घाटन श्रीलंकेतील खा.भन्ते अतुलरीय महाथेरो यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले. यावेळी भन्ते प्रा.डॉ. एम. सत्यपाल महाथेरो, भन्ते बुद्धभूषण, भन्ते सुगतशांती थेरो बुद्धगया व आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार सुरेशदादा गायकवाड यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

प्रारंभी तथागत बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमेस अभिवादन करून पंचशील झाल्यावर रमाई वधू-वर सूचक केंद्राचे उद्घाटन झाले. केंद्राचे प्रमुख डी.पी. गायकवाड यांनी पू. भिख्खू संघाचे व मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत केले.सुरेशदादा गायकवाड यांनी मनोगत व्यक्त करताना जास्तीत जास्त पालकांनी आपल्या पाल्यांची नावे केंद्रात नोंदवावीत. तसेच पैसा व वेळेची बचत करण्यासाठी दि. २७ मे २०२६ रोजी महाविहार बावरीनगर, दाभड येथे होणाऱ्या सामूहिक मंगल परिणय सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. यावेळी गंगाधर सूर्यवंशी, प्रा. देवीदास मनोहरे, पी.एस. गवळे, जी.बी. सोनकांबळे, पी.एच. गजभारे, सुभाष काटकांबळे, नगरसेविका राजश्री कुलदीप राक्षसमारे, एम.पी. गायकवाड, शिवाजी सोनकांबळे, डी.एन. गोधने, डी.डी. भालेराव, जी.एस. गायकवाड, भाऊराव जोंधळे, विठ्ठलराव कोलते, बबन महागडे, कमलाकर गायकवाड यांच्यासह इतर उपस्थित होते.



# ५ हजाराचा गुटखा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील विष्णुनगर भागातील एका किराणा दुकानातून अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाच हजार रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. कैलाश किराणा ॲण्ड जनरल स्टोअर्स मधून गुटखा विक्री होत असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली. मंगळवारी अधिकाऱ्यांनी विष्णुनगर मधील सदरील दुकानाची तपासणी केली असता त्यामध्ये गुटख्याचा साठा आढळून आला आहे.

# जिल्ह्यातील नागरिकांनी जास्तीत जास्त स्व-गणना करावी:जिल्हाधिकारी

नांदेड/प्रतिनिधी-भारताची जनगणना-२०२७ ही पहिली डिजिटल जनगणना लवकरच सुरू होणार आहे. जिल्ह्यातील सर्व नगारिकांनी येत्या १ ते १५ मे पर्यंत स्व-गणना करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. जिल्ह्यातील प्राचार्य, गटशिक्षणाधिकारी, एनएसएस व एनसीसीचे समुपदेशक यांची बैठक जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा नियोजन भवन येथे संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते.

स्व-गणनेची माहिती अधिकृत संकेतस्थळावर १ ते १५ मे २०२६ पर्यंत भरता येईल. नोंदणी केलेली संपूर्ण माहिती ही गोपनीय राहणार असून स्व-गणनेत नांदेड जिल्हा प्रथम येईल, अशा पद्धतीने सर्वांनी स्व-गणनेचे नियोजन करुन जास्तीत जास्त स्वगणना करावी, असेही आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.७०६/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.२४/४/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **फेरोज खान पि.जब्बार खान पठाण** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५६६/४० गट क्र.५६६ प्लॉट क्र.४०** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **मोहम्मद अब्दुल हकीम पि.मोहम्मद अब्दुल हफिज** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ८८१/२०२५, दि.७.४.२०२५, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.३९, पश्चिमेस :- प्लॉट क्र.४१, उत्तरेस :- महेबुब खान यांचे घर, दक्षिणेस :- १५ फुट रुंद रस्ता

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

CHANGE IN NAME

My (old name) is **LAHOTI BAJRANG** which now I am, changing as (new name) **BAJRANG VIJAYPRAKASH LAHOTI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**BAJRANG VIJAYPRAKASH LAHOTI**
R/o 44, ward no.3, At.post Hadgaon
Tq.Hadgaon Dist. Nanded-431712
M.No.-9422862669

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१६७३/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.६/१०/२०२५

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **देविदास पि.नारायण मुकाडे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **५१०/४७ गट क्र.५१० प्लॉट क्र.४७** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२५** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **डॉ.म.खुर्शीद अहेमद अ.अमीन व इतर** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ७०५/२०२५ दि.२३.०७.२०१५, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.४२, पश्चिमेस :- २० फूट रुंद रस्ता, उत्तरेस :- प्लॉट क्र.४६, दक्षिणेस :- प्लॉट क्र.४८

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.७०३/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.२४/४/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **रफीक अहेमद पि.अब्दुल वहीद** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **६५६/११० गट क्र.६६२ प्लॉट क्र.११०** वरील नाव बदल करणे **दि.२८/४/२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **नुरुनिसा बेगम भ्र.शेख सलीम** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ६२९/२०२६ दि.८.४.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- अ.बारी यांचे शेत, पश्चिमेस :- २५ फूट रस्ता, उत्तरेस :- प्लॉट क्र.१०९, दक्षिणेस :- प्लॉट क्र.१११

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.७०४/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.२४/४/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **वर्षा भ्र.राहुल पारटकर** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **६७५/१८ गट क्र.५१८ प्लॉट क्र.१८** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **गंगाबाई भ्र.पोशट्टी राजरपोड** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ५५०/२०२६ दि.२५.३.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.१६, पश्चिमेस :- २० फूट रुंद रस्ता, उत्तरेस :- प्लॉट क्र.१७, दक्षिणेस :- पंडीत कानोडे यांची जमिन

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

## नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.७०५/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.२४/४/२०२६

### जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **लक्ष्मीबाई काशिनाथ सोनाळे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **२५३९/७ गट क्र.१६७ प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **काशिनाथ उत्तम सोनाळे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- सहमतीपत्र, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- रस्ता, पश्चिमेस :- नामदेव गायकवाड, उत्तरेस :- नामदेव गायकवाड, दक्षिणेस :- जळबाजी

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

